# पुण्यनगरी



कोल्हापूर : भोगावती महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानपत्र देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मान्यवर.

# नॅकची ए ग्रेड मिळाल्याबद्दल भोगावती महाविद्यालयाचा गौरव

राशिवडे : प्रतिनिधी

कुरुकली, ता. करवीर येथील भोगावती महाविद्यालयाला नॅकची ए ग्रेड मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठाच्या वर्धापनदिन समारंभात महाविद्यालयाचा गौरव करण्यात आला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव झाला. भोगावती महाविद्यालयाने सर्वच क्षेत्रात केलेल्या चौफेर कार्याचा यावेळी कुलगुरू शिर्के यांनी गौरव केला. महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे सांगितले. यावेळी भोगावती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, सर्व संचालक, माजी प्राचार्य डॉ. दिनकर पाटील, प्राचार्य आर. ए. सरनोबत, नॅकचे समन्वयक डॉ. टी. एम. चौगले, उपप्राचार्य डॉ. एन. एम. पाटील, आर. बी. हंकारे, पी. एस. पाटील, अजित कांबळे, शामराव कोईगडे उपस्थित होते.

22 NOV 2021

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅक मानांकनाबाबत भोगावती महाविद्यालयाचा सत्कार



**कोल्हापूर : भोगावती महाविद्यालयाला नॅक मानांकन मिळाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविले.**

शाहूनगर, ता. २१ : कुरुकली (ता. करवीर) येथील भोगावती महाविद्यालयाला नॅकची 'ए' ग्रेड मिळाल्याबद्दल शिवाजी विद्यापीठातर्फे महाविद्यालयाचा गौरव केला. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचे हस्ते महाविद्यालयाच्या पदाधिकाऱ्यांचा सन्मानपत्र देऊन गौरव झाला.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे डॉ. शिर्के यांनी सांगितले. या वेळी भोगावती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष जयसिंगराव हुजरे, उपाध्यक्ष सर्जेराव पाटील, सर्व संचालक, डॉ. दिनकर पाटील, प्राचार्य आर. ए. सरनोबत, डॉ. टी. एम. चौगले, प्राचार्य डॉ. एन. एम. पाटील, आर. बी. हंकारे, पी. एस. पाटील, अजित कांबळे, शामराव कोईगडे उपस्थित होते.